अधिष्ठाता यांचेकार्यालय,
शासकीय आयुर्वेदरुग्णालय,वजीराबादनांदेड
OFFICE OF THE DEAN
GOVT.AYURVED HOSPITAL, VAZIRABAD, NANDED
☎ कार्यालय फोन:- ०२४६२-२३२८६७ ई-मेल-gahnanded@gmail.com

प्रति,
.....................................
.....................................

विषय :- शासकीय आयुर्वेद रुग्णालय,वजीराबाद नांदेड
ऑक्सिजन जनरेशन प्लॅन्ट ते आंतररुग्ण विभागापर्यंत ऑक्सिजन पाईपलाईन प्रस्थापित करणे करिता दरपत्रक सादर करणे बाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, कोव्हीड-१९ अंतर्गत मंजुर निधीतुन शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नांदेड साठी ऑक्सिजन जनरेशन प्लॅन्ट ते आंतररुग्ण विभागापर्यंत ऑक्सिजन पाईपलाईन प्रस्थापित करणे करिता दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर बाबींचे **विर्निदिष्टे (Specification) खालील प्रमाणे** आहेत.

## विर्निदिष्टे (Specification)

| Sr. No. | Item Name | Specification | Qty. | Rate | Amount | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Copper pipe | 42 mm ( 0.9 mm ) | 50 mile | | | |
| 02 | Copper pipe | 28 mm ( 0.9 mm ) | 30 mile | | | |
| 03 | Copper pipe | 22 mm ( 0.9 mm ) | 50 mile | | | |
| 04 | 22 mm Isolation Valve | ( Brass ) | 4 Nos. | | | |
| 05 | 42 mm Isolation Valve | ( Brass ) | 2 Nos. | | | |
| 06 | 10X10 Control Pannel | | 1 Nos | | | |
| 07 | 42 mm Pressure guage | | 2 Nos. | | | |

आपणास सुचित करण्यात येते की,रुग्णालयासाठी ऑक्सिजन जनरेशन प्लॅन्ट ते आंतररुग्ण विभागापर्यंत ऑक्सिजन पाईपलाईन प्रस्थापित करणे करिता वर दर्शविण्यात आल्याप्रमाणे विर्निदिष्टे (Specification) लागणारे साधन सामुग्री/उपकरणे पुरवठा करणे करिता दिलेल्या विर्निदिष्टे (Specification) नुसार कमीत कमी दराची मोहोरबंद पाकिटातील दरपत्रके दि. २४/११/२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा बेताने मा.अधिष्ठाता शासकीय आयुर्वेद रुग्णालय नांदेड. यांचे कार्यालयात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन सादर करण्यात यावीत.

| अ. क्र. | बब | कालावधी |
|---|---|---|
| १ | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी | दि. १५/११/२०२१ ते दि. २४/११/२०२१ (या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत शासकीय व स्थानिक सुट्टीचे दिवस वगळुन सकाळी १०.००ते सायं.०५.०० वाजेपर्यंत |
| | दरपत्रक उघडण्याचा दिनांक व वेळ | दि. २५/११/२०२१ रोजी सकाळी ११.००वाजता. |
| | दरपत्रक उघडण्याचे ठिकाण | अधिष्ठाता,शासकीय आयुर्वेद रुग्णालय,नांदेड यांचे दालन. |

**अटी व शर्ती**

१. दिनांक २४/११/२०२१ रोजी संध्याकाळी ०५:०० वाजल्यानंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणारा नाही.

२. दरपत्रक सादर करतांना अशा प्रकारच्या खरेदीवर आकारल्या जाणारे विविध कर (टॅक्सेस) स्वतंत्रपणे नमुद करावे.

३. दरपत्रक सादर करतांना जी.एस.टी. क्रमांक नमुद असलेल्या लेटरहेड वर सादर करावे.

४. ज्या साधन सामुग्री करिता दरपत्रक सादर करण्यात येत आहे. ते आय.एस.आय. चिन्हांकित असेल तर ठळकपणे नमुद करावे.

५. दरपत्रक सादर करणाऱ्या दरपत्रकाचा किंवा संस्थेच्या दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणाऱ्या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असु नये तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके नाकारण्यात येतील. याकरिता सोबत जोडण्यात आलेली हमी पत्र दरपत्रक धारकास सादरकरणे बंधनकार राहील. (सोबत हमीपत्र विहित नमुण्यात सादर करावेत)

६. ऑक्सिजन जनरेशन प्लॅन्ट ते आंतररुग्ण विभागापर्यंत ऑक्सिजन पाईपलाईन प्रस्थापित करणे करिता देण्यात येणारा हमी कालावधी (वारंटी) कालवधी ठळकपणे नमुद करावा.

७. दरपत्रका सोबत ज्या ऑक्सिजन जनरेशन प्लॅन्ट ते आंतररुग्ण विभागापर्यंत ऑक्सिजन पाईपलाईन प्रस्थापित करणे करिता दरपत्रक सादर करण्यात येत आहे. आवश्यक ती विस्तृत माहिती असलेली .

८. दरपत्रक सादर करतेवेळी मोहोरबंद/पॉकीटावर ऑक्सिजन जनरेशन प्लॅन्ट ते आंतररुग्ण विभागापर्यंत ऑक्सिजन पाईपलाईन प्रस्थापित करणे करिता दरपत्रक असे स्पष्ट नमुद करावे.

९. खरेदी प्रक्रिया यशस्वी दरपत्रक स्विकारण्यापूर्वी किंवा यशस्वी दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर देखील कोणत्याही वेळी लेखी नमुद करावयाच्या कारणामुळे रद्द करण्याचे अधिकार हे कार्यालय राखुन ठेवीत आहेत.

१०. विहित कालावधीत प्राप्त दरपत्रके दिनांक २५/११/२०२१ रोजी सकाळी ११-०० वाजता अधिष्ठाता यांच्या दालनात उघडण्यात येतील त्यावेळी कंपनपीच्या एका प्रतिनिधीस स्वखर्चाने उपस्थित राहण्यास मुभा राहील.

११. दरपत्रक उघल्यानंतर आपण सादर केलेल्या यंत्राच्या विर्निदिष्टे (Specification) नुसार सादर यंत्राची प्रत्यक्ष पडताळणी व आवश्यकता वाटल्यास चाचणी रुग्णालयातील संबंधित तज्ञामार्फत करण्यात येईल त्याकरिता आपण आवश्यक ती व्यवस्था करुन ठेवावी.

१२. पुरवठादारांने सदर खरेदी संदर्भातील आवश्यक ती माहिती या सोबतच्या (Annexure-B) मध्ये सादर करावी.

१३. प्रत्येक उपकरणे/साहित्य करिता स्वतंत्र दर पत्रके सादर करावीत.

१४. पुरवठाधाकांने पुरवठा केलेली साधन सामुग्री/उपकरणे जाहिरातीमध्ये दिलेल्या विर्निदिष्टे (Specification) नुसार असणे आवश्यक आहे. व तांत्रिक समितीने मान्य करणे आवश्यक राहील तसेच सदरील ऑक्सिजन जनरेशन प्लॅन्ट ते आंतररुग्ण विभागापर्यंत ऑक्सिजन पाईपलाईन प्रस्थापित करण्याचे काम तांत्रिक समितीस मान्य नसल्यास आपले पुरवठा आदेश रद्द करण्यात येईल.

१५. खरेदी प्रक्रियेच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याच्या अधिकार अधिष्ठाता शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नांदेड हे राखुन ठेवीत आहेत.

**वैद्य वाय.आर.पाटील**
अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड.

# Annexure-B

कंपनीच्या लेटरहेडवर खालील नमूद तपशिलाप्रमाणे माहिती भरणे.

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद रुग्णालय,
वजिराबाद, नांदेड.

**कोव्हीड-१९ अंतर्गत मंजुर निधीतुन शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नांदेड साठी ऑक्सिजन जनरेशन प्लॅन्ट ते आंतररुग्ण विभागापर्यंत ऑक्सिजन पाईपलाईन प्रस्थापित करण्याकरिताचे दरपत्रक.**

| अ. क्र. | तपशिल | आवश्यक माहिती वा प्रमाणपत्रे जोडण्यात आलेली आहेत किंवा कसे. |
|---|---|---|
| १ | पुरवठादाराचे नावं | |
| २ | कंपनीचा पत्ता, दुरध्वनी ई-मेल आयडीसहीत | |
| ३ | कंपनीचा नोंदणी क्रमांक (Registration No.) | |
| ४ | यंत्राचे नाव आणि मॉडेल क्रमांक | |
| ५ | विर्निदिष्टे (सोबत जोडण्यात आलेल्या सहपत्रानपुसार) Annexure-B | |
| ६ | G.S.T. No. | |
| ७ | शासनाचे कर | |
| ८ | इतर कर | |
| ९ | I.S.I Mark इ (आयएसआय) चिन्हाकिंत आहे किंवा कसे असल्यास तत्संबंधीचे प्रधिकरणाकडील प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडण्यात आली आहे. किंवा कसे) | |
| १० | उत्पादक असल्यास तसे नमुद करावे अथवा प्रधिकृत पुरवठादार असल्याबाबतचे उत्पादक कंपनीचे पत्र. | |
| ११ | सदर यंत्राचा इतर शासकीय/निमशासकीय कार्यालयास पुरवठा केला असल्यास अशा कार्यालयाचे पत्ते व दुरध्वनी क्र.अथवा पुरवठा आदेशांची छायांकित प्रत. | |
| १२ | हमी कालावधी (Warranty Period.) | |
| १३ | यंत्राची माहिती पुस्तिका/पत्रक | |
| १४ | हमीपत्र | |
| १५ | इतर अटी व शर्ती असल्यास | |

**स्थळ :-**

**ठिकाण :-**

पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित